# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी

**प्रस्तावना :-**

**विषय :- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा उभारणे बाबत.**

**सदर्भ :- नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. मनपा-२०२२/प्र.क्र. ८०(२) न.वि.१६ मंत्रालय मुंबई दि. २७/०४/२०२२**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे अस्तित्वात असलेल्या जुन्या पुतव्याच्या जागी नविन श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा उभारणे कामी संदर्भिय शासन निर्णयान्वये ०३ कोटी निधीची मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर पत्रान्वये मनपास **महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकास** योजनेअंतर्गत ७५% हिस्सा राज्य शासनाचा व २५% हिस्सा महानगरपालिकेचा राहणार आहे.

विषयांकीत कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रु. २,९९,७२,३६१/- इतकेचे प्रस्ताव तयार करुन मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे मंजुरि करिता सादर करण्यांत आले असता, सदर प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक ३१/०५/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये प्रशासकीय मान्यता करिता मा. जिल्हाधिकारी, ठाणे. यांचेकडे प्रस्ताव पाठविणेकामी प्रशासकीय ठराव करणेकामी मंजुरिस्तव सविनय सादर.

**ठराव क्रं. :-** ९८२ **दिनांक :-** ६/६/२०२३

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे अस्तित्वात असलेल्या जुन्या पुतव्याच्या जागी नविन श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा उभारणे कामी शासन निर्णय क्रमांक : **शासन निर्णय क्र. मनपा-२०२२/प्र.क्र. ८०(२) न.वि.१६ दि. २७/०४/२०२२** रोजी ०३ कोटी निधीची मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर पत्रान्वये मनपास **महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकास** योजनेअंतर्गत ७५% हिस्सा राज्य शासनाचा व २५% हिस्सा महानगरपालिकेचा राहणार आहे.

उपरोक्त नमुद कामाचे प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषःत कलम ४५२ अ (१अ)व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये वरिल नमुद कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रु. २,९९,७२,३६१/- च्या प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी, ठाणे. यांचेकडे प्रशासकीय मान्यता करिता पाठविणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये मंजुरी देत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका